राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३५३७/२०२५**
**बोर्ड क्र.१०**

श्री. महेश अशोकराव गवळी, — अपिलार्थी
रा. पायेनीर, पहिला मजला, प्लॉट नं.०६, मेन रोड, उल्कानगरी, गारखेडा परिसर, अहमदनगर बँके समोर, जवाहर नगर पोलीस स्टेशन जवळ, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९८२३९८०२९९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ लिपीक,
घनकचरा व्यवस्थापन विभाग,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त-०५,
घनकचरा व्यवस्थापन विभाग,
महानगरपालिका, छत्रपती संभाजाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०२.२०२५ | दि.१५.०२.२०२३ ते दि.२५.०२.२०२५ या कालावधीतील शहर धुळमुक्त करण्यासाठी केलेल्या उपाययोजना बद्दल व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१४.०५.२०२५ रोजी ईमेल आयडीवर माहिती पाठविलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात व युक्तिवादात अर्धवट, अपुर्ण दिशाभूल करणारी माहिती दिली असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3473 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८६९/२०२५**
**बोर्ड क्र.११**

श्री. अब्दुल इम्रान अब्दुल खालेद खान, — अपिलार्थी
रा. अलहिलाल कॉलनी,
तलाह मस्जिद जवळ, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९२७०४५१५१८.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
पाणी पुरवठा झोन क्र.१,२ व ९,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (प्र.),
पाणी पुरवठा, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०५.२०२५ | अलहिलाल कॉलोनी जलाल कॉलोनी खाम नदी अलिकडची कॉलोनी व खाम नदी पल्लीकडची कॉलोनीत महानगर पालिकातर्फे नळाची लाईन टाकलेली आहे का. याची सत्यप्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी दि.२७.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, १० दिवसात नि:शुल्क माहिती देण्यात यावी असे आदेशीत केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारुन पोहच दिलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-३५७५ दिनांक :- १३/३/२०२६

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५४५/२०२५**
**बोर्ड क्र.१४**

श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन, — अपिलार्थी
रा. घर क्र.०१-१२-७१ जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९७६४६९९७८६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पदनिर्देशित अधिकारी,
झोन क्र.०४, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक उप आयुक्त, झोन क्र.४,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.१२.२०२४ | M.R. फॅक्शन हॉल व व्यवसायिक दुकानाचे महानगरपालिकाचे कोणत्याही बांधकाम परवानगी न घेता केलेले अवैध बांधकाम अतिक्रमण निष्कासित ककरण्यासाठी दि.०६.११.२०२४ रोजी अर्ज व दि.१८.११.२३०२४ रोजी प्रथम स्मरण पत्रावर आपल्या कार्यालयामार्फत झालेली कायदेशीर कारवाईची माहिती मिळणेबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन मोफत माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा

भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तयार होती, तथापि अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे त्यांना दि.०३.०२.२०२६ रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. तसेच माहितीचा एक संच आज रोजी सोबत आणलेला आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. तसेच आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3506 दिनांक :- 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४४८/२०२५**
**बोर्ड क्र.१८**

श्री. नंदकिशोर काकासाहेब नवपुते,
रा. शॉप नं.२४, जेथालिया टॉवर, गुलमंडी, छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९४२३१४७६७६. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता नगर रचना, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
नगर रचना, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.११.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.१२.२०२४ | दि.०६.०६.२०१७ या कालावधीतील सौ. सुनिता संतोष वैष्णव यांनी आवक्र क्र.१४/२०१७-१८ अन्वये दि.०६.०६.२०१७ रोजी T.D.R. प्रस्ताव सादर केलेले असून सदर प्रस्तावाच्या संपूर्ण संचिकेची छायांकित प्रत मिळणे. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संचिकेचा शोध सुरु असून,

सदर संचिका प्राप्त होताच आपणास विना विलंब माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, संबंधित संचिकेचा शोध घेण्यासाठी कार्यवाही प्रस्तावित करावी व संबंधितास संचिका प्राप्त होताच विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दयावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार उपसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3475 दिनांक : 13/3/2026

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २०९४/२०२५**
**बोर्ड क्र.१९**

श्रीम. शैला सतिशचंद्र उबाळे, — अपिलार्थी
रा. प्लॉट क्र.२४, राजनगर स.गृह.नि.संस्था दर्गा ते गादिया विहार रस्तर शहानुरवाडी, छत्रपती संभाजीनगर-४३१००९.
मो. नंबर-७५८८४००८९० / ९९२२४४६१६३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता नगर रचना,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक नगर रचना,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१२.२०२४ | श्री. मधुबन शिक्षक स.गृ.सं.शहानुरवाडी सर्वे नं.१३/५ मधील भूखंड क्र.१४ च्या दक्षिण दिशेकडील समांकनाची मोजमाप बाबीची माहितीबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी

यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली असल्यामुळे देय होत नाही, असे अपिलार्थी यांना दि.२७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता नगर रचना, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर, यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपसंचालक नगर रचना, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3476 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२३१/२०२५**
**बोर्ड क्र.२०**

श्री. उस्मान रहेमान शेख, — अपिलार्थी
रा. शम्श नगर, परदेशी हाईटच्या पाठीमागे ओम साई वॉशिंग सेंन्टरची गल्ली, शहानुरवाडी, औरंगाबाद
(छत्रपती संभाजीनगर).
मो. नंबर-७३७८८९९४८९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
नगर रचना विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१७.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २० | ५२३१/२०२५ | ०८.०९.२०२५ | सन २०१२ ते आजपर्यंत या कालावधीतील बाराभाई ताजीया पैठण गेट या १५ मिटर रुंद विकास योजना रस्त्यात सिटीएस नं.५०४२ रॉयल्टी बुक बायडींग, पैठण गेट मालमत्ता महानगर पालिका या रस्त्यामध्ये ५०४२ ची किती जागा घेण्यात आली व रस्ता रुंदीकरणामध्ये मोबदला घेण्यासाठी आपल्याकडे किती अर्ज आले याची माहिती लेखी स्वरुपात देणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१०.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देवून मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलमानुसार देय होत नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती, उक्त अधिनियमाचे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याने अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3477 दिनांक :-13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२३२/२०२५**
**बोर्ड क्र.२१**

श्री. उस्मान रहेमान शेख, — अपिलार्थी
रा. शम्श नगर, परदेशी हाईटच्या पाठीमागे ओम साई वॉशिंग
सेंन्टरची गल्ली, शहानुरवाडी, औरंगाबाद
(छत्रपती संभाजीनगर).
मो. नंबर-७३७८८९९४८९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
नगर रचना विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१७.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २१ | ५२३२/२०२५ | २२.०८.२०२५ | सन २०२५ ते आजपर्यंत या कालावधीतील सिटीएस नं.१७७३३, जिजामाता कॉलनी रोड, युनियन बँक ऑफ इंडिया समोर पैठण गेट, छ.संभाजीनगर कोमल राजकुमार जैस्वाल नगर रचना बांधकाम परवानगी मंजूरी क्रं.२६८३१२/२०२४यांचे विरोधात दि.०६.०५.२०२५, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३०.०७.२०२५ रोजी नोटीस देवून बांधकाम थांबविण्यासाठी अर्ज देण्यात आलेला आहे. मी दिलेल्या अर्जावर आजपर्यंत काय कार्यवाही केली त्याची लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे अवलोकन करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२१.०४.२०२५ रोजीच्यापत्रान्वये, कार्यालयात उपस्थित राहून संचिकेची पाहणी करावी, पहाणी नंतर आपणास पाहिजे असलेल्या दस्तावेजावर खुणा करुन देण्यात याव्यात व त्याबाबत आवश्यक ते शुल्क लेखा विभागात जमा करुन पावतीची प्रत या विभागात सादर करावे असे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.२१.१०.२०२५ रोजी माहिती देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२१.१०.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचा पुरावा आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी केलेला युक्तिवाद व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (पुनश्च: एकदा) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. उपसंचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 3478 दिनांक :- 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५५२७/२०२५**
**बोर्ड क्र.२२**

श्री. अब्दुल राजिक अब्दुल रऊफ, — अपिलार्थी
रा. जमजम टॉवर फ्लॉट क्र.०३, रोजाबाग,
छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर ९८२३३३३२५५.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
नगर रचना विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २२ | ५५२७/२०२५ | २१.०७.२०२५ | ०१. आज दिल्ली गेट ते टि पॉईट येथील सध्याच्या रस्ता रुंदीकरणाचे आजचा मोजमाप किती रस्ता किती मीटरने रुंद केले व इतर चार मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. प्रचलित पध्दतीनुसार आवश्यक ते शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दि.१९.०८.२०२५ रोजी कळविण्यात आले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मुद्या क्र.२ संदर्भात माहितीच्या अनुषंगाने त्यांना दि.१९.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम २००५ सुरु होण्यापूर्वी पासून भाग नकाशा देण्याची कार्यपध्दती आहे. आपण अपेक्षिलेल्या माहितीचा तपशिल या विभागाच्या आरेखन कक्षात उपलब्ध असून, प्रचलित पध्दतीनुसार आवश्यक ते शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविण्यात आले आहे. तसेच मुद्या क्र.१,३,४ व ५ बाबत मागणी केलेली माहिती प्रनश्नार्थक स्वरुपाची असल्याने देय होणार नाही असे कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती, उक्त अधिनियमाचे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याने अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 3479 **दिनांक :** 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७४७/२०२५**
**बोर्ड क्र.२३**

श्री. अब्दुल वासेक अब्दुल हफीज, — अपिलार्थी
रा. गंजे शहिदा मस्जीद जवळ, जुना बायजीपुरा,
छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर.९६६५६९४२३६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
नगर रचना विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१५.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २३ | ५७४७/२०२५ | ०२.०९.२०२५ | T.D.R. साठी प्रस्ताव दाखल केला आहे करिता मोहमद मोईनोद्दिन या नावाने T.D.R. प्रस्तावाची माहिती देणेबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अभिलेख कक्षातील वर्गीकरणाचे काम सुरु असल्याने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आढळून आलेली नाही याबाबत अपिलार्थी यांना दि.०८.०१.२०२५ रोजी कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून उपसंचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3480 दिनांक :- 13/3/2026

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५५२६/२०२५**
**बोर्ड क्र.२४**

श्रीमती राबिया मोहमंद अली रोगे, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.२८ ते ३२ गट नं.१०५/१०६,
छत्रपती संभाजीनगर, मो. नंबर ९९६७४३९७३२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक आयुक्त झोन क्र.०१,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त-१, (कर),
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| 14.08.2025 | Please furnish me in details alongwith documents of (1) The survey & assessment report in respect of property No.A0043337, Plot N0. 28 to 32, Gut N0.105 (2) Since which date assessment/property tax are made and or been levied in the area of mitmita (3) Dated of inclusion of mitmita within the limit of Muncipal Corporation Aurangabad (4) Extract of tax of Property No.A0043337 for the year 2021-22,2022-23, 2023-24 and 2024-25 (5) Name of the occupant/ownership details in respect of property No.A0043337, Plot No 28 to 32 (6) Name and designation of the person who carried out the above survey (7) All circulars connecting papers of survery report and of property tax being levied in the area of mitmita. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केल्यानुसार मोजणी करण्यासाठी जायमोक्यावर गेलो असता अपिलार्थी हे स्वत: उपस्थित नसल्यामुळे मोजणी करण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना ०७ दिवसांच्या आत माहिती विनामूल्य पुरवावी असा निर्णय पारित केलेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त झोन क्र.०१, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप आयुक्त-१, (कर), छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3481 दिनांक :- 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ०९४०/२०२५**
**बोर्ड क्र.२५**

श्री. प्रशांत सुभाष देसरडा, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.७७ सुराणा नगर, मुरलीधर अपार्टमेंटच्या बाजूला,
जालना रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००१.
मो. नंबर-९४२२२११३३१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
स्मार्ट सिटी तथा
प्रशासक, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
चेअरमन स्मार्ट सिटी तथा
प्रशासकी, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०८.२०२४ ऑनलाईन अर्ज | छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) महाराष्ट्र स्मार्ट सिटी अंतर्गत तोतला हॉस्पीटल ते सुराना नगर रोड तक क्रॉक्रीटीकरणाबाबत व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त

झाल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, स्मार्ट सिटी तथा प्रशासक, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. चेअरमन, स्मार्ट सिटी तथा प्रशासक, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 3482 दिनांक :- 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०२९/२०२५**
**बोर्ड क्र.२६**

श्री. विश्वजीत अशोक जाधव, — अपिलार्थी
रा. एच.पी. पेट्रोलपंपामागे, रमानगर, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९९२३७००२००.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त-२,
छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, क्युरेटर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.१०.२०२४ | सन २०१९ ते २०२४ या कालावधीतील टी. व्ही. सेंटर येथील महानगर पालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळा क्र.२५ च्या गाळाधारकास व्यापारी संकुलाच्या किती गाळयामागील मोकळी जागा देण्यात आली आहे व कोणत्या नियमानुसार देण्यात आली आहे हयाचा तपशिल देण्यात यावा. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१४.०८.२०२५ रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असे लेखी नमूद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१४.०८.२०२५ रोजी माहिती दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 3483 दिनांक :- 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७४८/२०२५**
**बोर्ड क्र.२७**

श्री. अकबर अमीर कुरेशी, — अपिलार्थी
रा. सिल्लीखाना, सि.बी.एस.रोड, महिला तक्रार कार्यालय समोर, छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९६६५२३६१३४.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक आयुक्त,
झोन अधिकारी क्र.२,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त-१,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, सहाय्यक आयुक्त (कर) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२५ | सन १९८९ च्या नंतर मालमत्ता कर धारक शेख अमीनाबी शेख जाकीर घर नं.४-१९-५३/पी, मुद्दा क्र.१ बिल क्र.११७३९ मालमत्ता क्र.D000५४०२ या मालमत्ता कर बिलाची आपल्या कार्यालयात कोणत्या वर्षी नोंद करण्यात आलेली असल्यास या साक्षांकित प्रत व माहिती मिळणेबाबत मुद्दा क्र.२ आपल्या कार्यालयात मालमत्ता कर आकारणे संदर्भात आपण जागेचे कोण कोणते पुरावे बघून मालमत्ता कर आकारणे नोंद करतात याची संपूर्ण तपशिल व माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला विलंबाने माहिती दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१६.०५.२०२५ रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१६.०५.२०२५ रोजी माहिती दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3484 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५३०५/२०२५**
**बोर्ड क्र.३०**

श्रीमती पुजा राजेंद्र सातदीवे, — अपिलार्थी
रा. घर नंबर४-१८-१७, जुना मोंढा जाफार गेट तक्षशिलानगर,
छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९८३४८५०७७८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्र. उप अभियंता, घरकूल विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१८.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२५ ऑनलाईन | महानगरपालिका रमाई घरकुल कक्षामध्ये लाभार्थ्यांनी घराचे काम सुरु असल्याचे फोटो जमा केलेले होते. ते सर्व फोटो व यादी रमाई आवास लोकशिक्षण प्रसारक मंडळ यास गरजवंत लाभार्थ्यांच्या घराचे काम चालू आहेत, त्यांचे सर्व करुन खात्यामध्ये पैसे जमा करावेत यासाठी आपण जी यादी पीएमसीला दिलेली होती. त्या यादीची पीएमसी कडून रमाई घरकुल विभागने घेतलेली पोचपावती अथवा मूळ प्रत देण्यात यावी व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मी जी माहिती मागितलेली ती दिलेली नाही. दुसरीच चुकीची माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना देय होणारी माहिती दि.०७.०८.२०२५ रोजी दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3459 दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३७३०/२०२५**
**बोर्ड क्र.३२**

श्री. संजय कचरु पवार,
रा. प्लॉट नं.७२, नंदनवन कॉलनी,
छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर ९९२३३३३३२१ ... अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
लेखाधिकारी,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर ... : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०५.२०२५ | सन २०२० ते २०२५ पर्यंतच्या कालावधी मधील जा.क्र.मनपा/लेखा/पेन्शन/२०२४/९०९ दि.३१.१२.२०२४ मधील पत्राच्या अनुषंगाने ०१. स्थानिक निधी लेखा परिक्षण आक्षेपावर पुर्तता: होवून दिनांक १०.०८.२०२४ रोजीच्या प्राप्त उत्तराची सत्यप्रत मिळणे व इतर तीन मुद्याबाबत... |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी लेखी निवेदन सादर केले आहे. त्या निवेदनाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3485 दिनांक :- 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८४४/२०२५**
**बोर्ड क्र.३४**

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, — अपिलार्थी
रा. हीना मंजील नुर कॉलनी टाऊन हॉल,
छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-८८५५९९९१२३ / ८०५५५६६६१७.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, (जनि),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (इमारती),
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.१२.२०२४ | उप अभियंता तनपुरे जल नि. सारन विभागात रुजू झाल्यापासून किती शौचालयाना परवानगी देण्यात आली व शौचालय संदर्भात पुर्ण माहिती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही व आदेश ही नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3486 दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८९४/२०२५**
**बोर्ड क्र.३५**

श्री. इद्रीस नवाब खान, — अपिलार्थी
रा. घर क्र.८-२३-४०६, गल्ली नं.२७, रहेमानिया कॉलोनी,
सिडको रोड, दत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-४३१००१.
मो. नंबर-९९७०९२३१४३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता, वार्ड क्र.३,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि अपिलार्थी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०१.२०२५ | मुलभूत सोयीसुविधा देण्यासाठी नागरिकांकडून मागवली जाणारी मालमत्ता कर व पाणीपुरवठा करावयाच्या पावत्या संबंधित माहितीबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२१.०१.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी संपूर्ण

माहिती मिळाली असे नमूद करुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3487 दिनांक : 13/3/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४३५/२०२५ व ४३६/२०२५**
**बोर्ड क्र.३७ व ३८**

श्री. सय्यद आरेफ स.हाशम, — अपिलार्थी
रा. घर नं.५-२५-८ गुलशन मस्जीद जवळ,
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद). मो. नंबर ९०२२७६६०१२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक आयुक्त-२,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त-०२,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ३८ | ०४३५/२०२५ | २५.११.२०२४ | दि.११.११.२०२४ अर्ज क्र.१ ची संपूर्ण माहिती मिळणे. |
| ३८ | ०४३६/२०२५ | २५.११.२०२५ | दि.११.११.२०२४ अर्ज क्र.१ ची संपूर्ण माहिती मिळणे. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3488 दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८१०/२०२५**
**बोर्ड क्र.३९**

श्री. सुनिल सखाराम साबळे, अपिलार्थी
रा. काझीवाडा भडकलगेट, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता झोन क्र.०१,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (ड्रेनेज),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०३.२०२५ | श्री. संजय चामले उप अभियंता हे झोन क्र.१ कार्यालयात रुजू झाल्यापासून ते आजपर्यंत ड्रेनेज देखभाल दुरुस्ती व नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अपुर्ण माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अपुर्ण मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०३.०४.२०२५ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची असल्याने निश्चित कामाची माहिती देणेची मागणी केल्यास माहिती उपलब्ध अभिलेखामधून देण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.

तथापि अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3489 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८८२/२०२५**
**बोर्ड क्र.४०**

| | |
|---|---|
| श्री. सुनिल सखारखक्म साबळे,<br>रा. काझीवाडा भडकलगेट, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरीष्ठ लिपीक,<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग,<br>छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त-०५,<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख,<br>छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका | : उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०२.२०२५ | वर्षे २०२३-२०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील आपल्या विभागामार्फत महानगरपालिका मुख्य कार्यालयातील साफसफाईसाठी दैनिक वर्तमान पत्रात सन २०२३-२०२४ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीची छायांकित प्रत देण्यात यावी व इतर ०४ मुद्याबाबत... |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलबध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3490 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८८३/२०२५**
**बोर्ड क्र.४१**

श्री. सुनिल सखाराम साबळे, — अपिलार्थी
रा. काझीवाडा भडकलगेट, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वार्ड अभियंता (वार्ड क्र.१०),
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (ड्रेनेज),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०३.२०२५ | उप अभियंता झोन क्र.१० अतर्गत सन २०२३-२०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील विकास कामासाठी काढण्यात आलेल्या टेंडरची माहिती, टेंडर झालेल्या कामांच्या वर्क ऑर्डरसाठी संबंधीत कंत्राटदाराने कार्यालयात जमा केलेल्या अनामत रक्कम डीडीची माहिती |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. त्यांना दंड लावण्यात यावा.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी व्यापक स्वरुपाची असून आपणास ठराविक कामांची माहिती हवी असल्यास ती माहिती रितसर पुरविण्यात येईल असे त्यांना दि.०९.०४.२०२५ व दि.१६.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मोघम विस्ततृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3460 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२७७/२०२५**
**बोर्ड क्र.४२**

श्री. प्रताप रामराव निंबाळकर,
रा. प्लॉट नं.७०/१, विष्णुनगर, जवाहर कॉलनी,
छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९७६५३९२७७१. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप आयुक्त-०३,
छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०६.२०२५रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि अपिलार्थी यांनी स्वाक्षरी केलेला रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.१२.२०२४ ऑनलाईन | मा. लेखा परिक्षक यांनी वेतन निश्चितीसाठी १. श्री पत्की २.श्री. दांडगे ३. श्री. लुटे हे सर्व सेवानिवृत्त यांना मा. लेखा परीक्षक यांनी ज्या नियमाच्या आधारे मंजूरी दिली आहे त्या नियमाची सत्यप्रत मिळणेबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झालेबाबत लेखी निवेदन सादर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद यांचे लेखी निवेदन विचारात घेता, व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 3491 दिनांक :- 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८८१/२०२५**
**बोर्ड क्र.४३**

श्री. निसार मोहियोद्दिन अहमद मोहियोद्दिन, — अपिलार्थी
रा. प्लॉट नंबर ३३, युनसु कॉलनी,
इमाद मस्जीद जवळ, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
नगर रचना विभाग,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०६.२०२५ | High Court order dated ०२/०८/२०२२ in Writ Petition No.५२७४/२०२२. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी अवगत केलेली माहिती आमच्या विभागाशी संबंधीत नाही. अतिक्रमण विभागाशी संबंधीत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आदेश मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अतिक्रमण विभागाशी संबंधित असल्याचे अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास असा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत

जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार सुसंगत हस्तांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन अधिनियमातील कलम ५ (४) नुसार संकलित / एकत्रित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपसंचालक, नगर रचना विभाग,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3461 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०५४/२०२५**
**बोर्ड क्र.४४**

श्री. रुपचंद सुखदेव पवार, — अपिलार्थी
रा. विठ्ठल रुक्माई मंदीराजवळ, भावसिंगपुरा,
छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा-आयुक्त (सामान्य प्रशासन),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त-३, छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०६.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०५.२०२५ | कार्यालयीन आदेश दिनांक २२.०६.२०११ च्या ओदशात असभ्य वर्तणूक करणेबाबतचा ठपका नमूद केल्याबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, अपेक्षीत असलेली माहिती दिली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती आढळून आलेली नाही असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली खरी माहिती दिलेली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती / माहितीची वस्तुस्थिती अवगत केलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २॥३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 3492 **दिनांक :** 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५३२३/२०२५**
**बोर्ड क्र.४५**

श्री. शेख शफिक शेख अजीम,
रा. शहानगर बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९६२३६८७९८८. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वार्ड अभियंता, (वार्ड क्र.०७),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (ड्रेनेज),
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापी अपिलार्थी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला आहे. प्रत्यक्ष सुनावणीच्यावेळी अनुपस्थित आहेत.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०६.२०२५ | सन २०२३-२४ ते २०२४-२५ या कालावधीतील महानगरपालिका झोन क्र.७ अंतर्गत केलेल्या सर्व कामाची माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०४.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, ३३ पृष्ठांची माहिती निवासस्थानी घेऊन गेलो असता घरातील व्यक्ती ती माहिती घेण्यास नकार दिलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आंहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3462 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६९६/२०२५**
**बोर्ड क्र.४६**

श्री. रवि भानुदास मिसाळ, — अपिलार्थी
रा. उस्मानपुरा पोलीस स्टेशन जवळ, दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, पाणी पुरवठा झोन क्र.६,७,८ व १० छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा, छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका

## (सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.१२.२०२४ | सन २०२० ते आजपर्यंत या कलावधीतील छत्रपती संभाजीनगर मधील इटखेडा येथील ४० ग्रीन बंगलोज को ऑपरेटीव्ही हाऊसिंग सोसायटी म.गअ नं.१८ व २० येथे डेव्हलपमेंट (Development) अंतर्गत टाकण्यात आलेल्या ४ इंच (व्यासाची) पाईप लाईनची मंजूरीची मूळ संविचकाची संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन

निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आढळून आलेली नाही असे अपिलार्थी यांना दि.२४.०२.२०२५ रोजी कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सर्व्हे करुन त्यांना आवश्यक माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देता दिशाभूल केल्या कारनाने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र. इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 3493 **दिनांक :** 13/3/2026 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
आयुक्त, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१६३/२०२५**
**बोर्ड क्र.४७**

श्री. शेख हामेद महेमुद, अपिलार्थी
रा. आर.के. किराणा बाबर कॉलनी,
कटकटगेट, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९१७२९४९५९१.

**विरुध्द**

१ ज़न माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता (प्र.),
पाणी पुरवठा झोन क्र.१,२ व ९,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (प्र.),
(पाणी पुरवठा), महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०६.२०२४५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०३.२०२५ | सन २०२३-२०२४ व २०२४- २०२५ आजपर्यंत या कालाधीतील संजय ढोबळ यांनी पाणी पुरवठा१/२/९ मध्ये निविदा अंतर्गत व ६७/३/सी मध्ये केले कामाची मोजमाप पुस्तिका मधील व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती दि.२४.१२.२०२५ रोजी दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२४.१२.२०२५ रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 2901 **दिनांक :** 2/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३७४/२०२५**
**बोर्ड क्र.४८**

श्री. शेख हामेद मेहमूद,
रा. आर.के. किराणा बाबर कालोनी कटकट गेट,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता, झोन क्र.६,७,८ व १०,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग,
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०३.२०२५ | सन २०२३-+२४ व २०२४-२०२५ आज पर्यंत या कालावधीतील संजय ढोवळ यांनी पाणी पुरवठा ६,७, व ८ मध्ये निविदा अंतर्गत व ६७/३/सी मध्ये केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिका मधील record entry व abstract bill ची प्रत तसेच त्याच केलेले GPS फोटो मिळणे प्रत्येक कामाचे R.E./A.B./GPS फोटो सेट प्रमाणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी रु.४,०७६/- रुपये भरुन घेतले. तथापि चुकीची माहिती व अपुर्ण माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांना दि.०६.०६.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन दि.१६.०६.२०२५ रोजी पोहच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या पत्रानुसार रक्कमेचा भरणा करावा, त्यानंतर मुळ अर्जात विचारणा केल्यानुसार अपिलार्थी यांनी अपेक्षिलेली माहिती ०२ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2899 दिनांक : 2/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९४६/२०२५ ते ३९५१/२०२५**
**बोर्ड क्र.४९ ते ५४ एकूण ०६ प्रकरणे**

श्री. जफर खान गफ्फार खान, अपिलार्थी
रा. संजयनगर बायजीपुरा गल्ली नं.ए-११, छत्रपती संभाजीनगर
मो. नंबर-९७६७४७१११९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक आयुक्त,
झोन क्र.४, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
**द्वि.अ.क्र.३९४६,३९४७ व ३९५१/२०२५**

१. जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
झोन क्र.५, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
**द्वि.अ.क्र.३९४८,३९४९ व ३९५०/२०२५**

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप आयुक्त-१,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०८.२०२५ (०६) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण सहा द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्यांचे दि.०४.०२.२०२६ रोजीचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी माहिती दिली नाही असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४९ | ३९४६/२०२५ | ०५.०३.२०२५ | झोन क्र.४ ची जेव्हापासून निर्मिती झाली तेव्हापासून ते आजपर्यंत व्यवसाय थकीत मालमत्ता मनपा ने सिल केले त्याची यादी देण्यात यावी (यादीमध्ये झोन क्रमांक/मालमत्ता क्रमांक/ नाव/पत्ता/थकीत कर इ.ची माहिती असणे आवश्यक) |
| ५० | ३९४७/२०२५ | ०५.०३.२०२५ | झोन क्र.४ ची जेव्हापासून निर्मिती झाली तेंव्हापासून आजपर्यंत व्यवसाय थकीत मालमत्ता मनपा ने सिल केले त्याची यादी देण्यात यावी (यादीमध्ये झोन क्रमांक/मालमत्ता क्रमांक/ नाव/पत्ता/थकीत कर इ.ची माहिती असणे आवश्यक) |
| ५१ | ३९४८/२०२५ | ०६.०५.२०२५ | जेव्हापासून झोन क्र.४ ची निर्मिती झाली तेव्हापासून ते आजपर्यंत झोन क्र.४ अंतर्गत येणारे शहरातील लॉन, मंगल कार्यालय, शादीखाने, हॉल सभागृह, यांना जे मालमत्ता कर आकारणीची नोटीस दिलेल्या आहेत त्या नोटीसीच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. |
| ५२ | ३९४९/२०२५ | ०६.०३.२०२५ | झोन क्र.५ ची जेव्हापासून निर्मिती झाली तेव्हापासून ते आजपर्यंत झोन क्र.५ अंतर्गत जितक्या छोटया मोठया कंपनी येत आहेत त्यांना आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराची यादी देण्यात यावी (यादीमध्ये झोन क्रमांक/ मालमत्ता क्रमांक / नाव/ पत्ता/ थकीत कर इ. ची माहिती असणे आवश्यक ) |
| ५३ | ३९५०/२०२५ | ०६.०३.२०२५ | झोन क्र.५ ची जेव्हापासून निर्मिती झाली तेव्हापासून ते आजपर्यंत झोन क्र.५ अंतर्गत जितक्या छोटया मोठया कंपनी येत आहेत त्यांना आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराची यादी देण्यात यावी (यादीमध्ये झोन क्रमांक/ मालमत्ता क्रमांक / नाव/ पत्ता/ थकीत कर इ. ची माहिती असणे आवश्यक ) |
| ५४ | ३९५१/२०२५ | ०५.०३.२०२५ | झोन क्र.४ मनपा जिल्हा विधि सेवा प्राधिकरण औरंगाबाद यांच्याकडे न्यायालयात दावा दाखल पुर्व प्रकरणात समेट घडवून आणण्यासाठी लोकअदालत मध्ये जे प्रकरणे पाठविली आहे त्याची यादी देण्यात यावी (यादीमध्ये झोन क्रमांक/ मालमत्ता क्रमांक/ नाव/ पत्ता/थकीत कर इ. ची माहिती असणे आवश्यक) |

आज रोजी सुनावणीदरम्यान **द्वि.अ.क्र.३९४८,३९४९ व ३९५०/२०२५ उपस्थित** जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान सर्व उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की,

अपिलार्थी यांच्या सहा प्रकरणावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे सहा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(सही/-) १५/३/२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 3463 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७१८/२०२५**
**बोर्ड क्र.५५**

श्री. फरुख नबू पठाण, अपिलार्थी
रा. अबरार कालोनी बीड बायपास छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९९२३७०४७३३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
पाणी पुरवठा झोन क्र.६,७ व १० महानगरपालिका
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियता (प्र.),
पाणी पुरवठा, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०८.२०२५ | दि.०१ जुलै २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत या कालावधीतील पाणी पुरवठा झोन क्र.६-७-८-१० मध्ये वार्ड क्र.११४ व ११५ मधील निविदा अंतर्गत जे काम देण्यात आले आहे त्या कामाची संचीका कार्येआदेश, Completion Certificate, GPS फोटो तसेच सदरील कामाचे मोजमाप पुस्तीकाची प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.०४.११.२०२५ रोजीच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दि.२५.११.२०२५ रोजी देय होणारी माहिती निशुल्क देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, ०८ दिवसात नि:शुल्क देण्यात यावी असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ३५५९ दिनांक : 13/3/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७१० ते ५७१२/२०२५**
**बोर्ड क्र.५६ ते ५८ एकूण ०३ प्रकरणे**

श्री. शेख आसिफ शेख आरिफ, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.१६ पटेल नगर बायपास,
छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९८२३१०११५०

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता (प्र.),
पाणी पुरवठा झोन क्र.६,७,८ व १०,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (प्र.),
पाणी पुरवठा,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५६ | ५७१०/२०२५ | २९.०८.२०२५ | पाणी पुरवठा झोन क्र.६-७-८-१० मध्ये सिल्क मिल कालोनी, हमालवाडा मधील पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीचे कामे करणेबाबत.अ.प. रक्कम ६,४०,७६३/- सदरील कामाचे ठेकेदाराचे MJP Registration ची प्रत, संचिका मधील सबमिशनची कार्येआदेश व GPS फोटोची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रत. |
| ५७ | ५७११/२०२५ | ०८.१०.२०२५ | पाणी पुरवठा झोन क्र.१० आपल्या कार्यालयाअंतर्गत वार्ड क्र १०८ सिल्क मिल कालोनी हमालवाडा शाहशोक्ता कालोनी, धनगरवाडा, गुलशन कालोनी, या मोहल्यान मध्ये २४/४/२०२५ त ३०/०९/२०२५ पर्यंत पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीचे झालेल्या कामांचे यादी दिनांकसह कामांचे नावासह GPS फोटो तसेच ठेकेदाराचे नावासह माहिती अधिकारांतर्गत मिळणेबाबत. |
| ५८ | ५७१२/२०२५ | ०३.०९.२०२५ | दि.०१.०१.२०२५ ते आजपर्यंत या कालावधीतील पाणी पुरवठा झोन क्र.६ व ७ मध्ये ६७(३)(C) मध्ये केले कामाची मोजमाप पुस्तिकाची प्रत तसेच त्याच केलेले कामाचे GPS फोटो, कार्यादेश Completion Certificate तसेच जे कामे ६७(३)(C) मध्ये मंजूर झाले ओ ज्याचे देयक देणा बाकी आहे त्या कामाचे मंजरीचे Submission व कार्योदशचे सबमिशन व GPS फोटो मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अपुर्ण माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी दोन प्रकरणात माहिती दि.०३.१०.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. एका प्रकरणात दि.०५.१२.२०२५ अपिलार्थी यांनी स्वीकारुन सही न करता निघून गेलेले आहेत.

आज रोजी सुनसावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही प्रथम अपिलावर दि.१७.११.२०२५ व दि.२६.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, संबंधितास उर्वरीत माहिती पुढील १५ व ०८ दिवसात नि:शुल्क देण्यात यावी असा जन माहिती अधिकारी यांना आदेश दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांना अपुर्ण माहिती मिळालेली आहे. तदनंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन नि:शुल्क माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांना अवलोकन देवून उर्वरीत माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (प्र.), पाणी पुरवठा झोन क्र.६,७,८ व १०, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन

अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती (यापूर्वी दिलेली माहिती वगळून उर्वरीत) अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता (प्र.), पाणी पुरवठा, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिलेनिकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3012 दिनांक : 2/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७७०, ५७७१ व ५८३६/२०२५**
**बोर्ड क्र.५९,६० व ६२ एकूण ०३ प्रकरणे**

१. श्री. शेख आसिफ, मो. नंबर-९८२३१०११५० — अपिलार्थी
२. श्री.अशोक दामले, मो. नंबर-७२७६२०२३३
३. फरुख पठाण, मो. नंबर-९९२३७०४७३३
४. एकनाथ निकम, मो. नंबर-९८२३१२१७७४

सर्व रा. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, झोन क्र.६,७,८ व १०,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी चारही अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५९ | ५७७०/२०२५ | ०६.१०.२०२५ | दि.०१.०७.२०२४ ते दि.३०.०९.२०२५ या कालावधीतील पाणी पुरवठा ६,७,८ व १० मध्ये टेंडर आय डी चे 2024_AMCA.1045796_1/2024_AMCA_1045796_2/2024_AMCA_1045796_3/2024_AMCA_1045796_4/2024_AMCA_1045796_5/2024_AMCA_1045796_6/2024_AMCA_1045796_7/2024_AMCA_1045796_8/2024_AMCA_1045796_9/2024_AMCA_1045796_13 सदरील सर्व कामे तसेच झोन क्र 6/7/8 अंतर्गत 67 (3)C चे कामाची मोजमाप पुस्तिकाची प्रत व त्याचे केलेले कामाचे GPS फोटो व कार्येआदेश व Completion certofocate, तसेच देयकाचे सबमिशन प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मिळणे. |
| ६० | २७७१/२०२५ | ०६.१०.२०२५ | २०२१-२०२२/ २०२२-२०२३ / २०२४-२०२५ /२०२५ ते आजपर्यंत या कालावधीतील पाणी पुरवठा झोन क्र.६/७/८/१० चे पीटी रजिस्टरची प्रत मिळणेबाबत. |
| ६२ | ५८३६/२०२५ | २८.०८.२०२५ | निविदा अंतर्गत जी कामे प्रस्तावित झाली होती व ती कामे ज्या ठेकेदाराला मिळाली होती. सदरील ठेकेदाराने AGENCY FIXING साठी अतिरिक्त सुरक्षा रक्कम व कार्येआदेश करण्यासाठी अनामत सुरक्षा रक्कमचे जे DD/ FD दिले होते त्याची प्रत मिळणे तसेच ठेकेदाराकडून ती DD/FD आपल्या कार्यालयात कोणत्या तारखेला जमा करुन घेण्यात आले व ती DD/FD ठेकेदाराला कोणत्या तारखेला परत करण्यात आली याची तपशील माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित चारही अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, बोर्ड अ.क्र.६० व ६२ मध्ये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. एका अपिलार्थीने माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीनही प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आदेश मिळाले नाहीत, अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधीताचे लक्ष माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ कडे वेधण्यात येत आहे. कलम ३ मध्ये असे नमूद केलेले आहे की, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल. याचाच अर्थ ज्या नागरिकांना माहितीची आवश्यकता आहे त्या प्रत्येक नागरिकांना माहिती अधिकारा अंतर्गत स्वतंत्र अर्ज करुन माहितीची मागणी करु शकतो. या प्रकरणातील माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचा अर्ज चार नागरिकांनी मिळूण सादर केला असल्याचे निदर्शनास येत आहे. मात्र या अनुषंगाने कलम ३ विचारात घेता, ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर निर्णय पारित करताना या सर्व बाबी विचारात घेतल्या असल्याचे दिसून येत नाही. भविष्यात त्यांनी या सर्व बाबी विचारात घेऊन निर्णय पारित करण्याची दक्षता घ्यावी.

सबब,प्रथम अपिलीय अधिकारी यांचा दि.२७.११.२०२५ व दि.३१.१०.२०२५ रोजीचा निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3013 दिनांक :- 2/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ५८३५/२०२५**
**बोर्ड क्र.६१**

श्री. शेख आसिफ शेख आरिफ, — अपिलार्थी
रा. प्लॉट पटेल नगर बीड, बायपास छत्रपती संभजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
झोन क्र.६,७,८ व १० महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१९.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०८.२०२५ | 1. पाणी पुरवठा झोन क्र.6/7/8/10 मध्ये खालील टेंडर आय डी (1) 2023_AMCA_953633_1/ कार्यादेश क्र.01) कार्यादेश दिनांक 11.01.2023 2) 2023_AMC_951487_1/ कार्यादेश क्र.52 कार्यादेश दिनांक 18/11/1023, 3) कार्यादेश क्र. 50 कार्यादेश दिनांक 18.10.2023 सदरील तिन्ही संचीकाची कार्यादेश प्रत, Completion certificate ची प्रत BOQ Summary Details ची प्रत तसेच केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिकाची प्रत तसेच त्यांचे केलेले कामाचे GPS फोटो मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण व चुकीची माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना देय होणारी माहिती दि.२०.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन नि:शुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती चुकीची व अपुर्ण मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3455 दिनांक : 13/3/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०३४१/२०२५**
**बोर्ड क्र.६३**

श्रीमती शहबाज बेगम,
रा. लक्ष्मीनगर मालटेकडी रोड देगलूर नाका,
परिसर, नांदेड-४३१६०४. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रभाग समिती (ब),
परभणी शहर महानगरपालिका, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१०.२०२५ | रिव्हीजन रजिस्ट्रला नोंद घेणे बाबत सादर केलेला दि.०३.१०.२०२३ रोजीचा प्रस्तावानुसार नोंद केल्याची साक्षांकित प्रत व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रभाग समिती (ब), परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी

अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपायुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3449 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६०५५ ते ६०५७/२०२५**
**बोर्ड क्र.६४ ते ६६ एकूण ०३ प्रकरणे**

श्री. कुशल संजय मोरे, — अपिलार्थी
रा. घर क्र.१०६, एकनाथ नगर, उस्मानुपरा,
छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९१४५४३८४८२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, झोन क्र.१,२ व ९,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ६४ | ६०५५/२०२५ | २१.०८.२०२५ | सन २०२१ ते आजपर्यंत या कालावधीतील पाणी पुरवठा १/२/९ मध्ये संजय ढोबळ यांनी निविदा अंतर्गत व ६७(३)C अंतर्गत केले कामाचे कार्येआदेशची प्रत मिळणेबाबत. |
| ६५ | ६०५६/२०२५ | ०८.१०.२०२५ | दि.०.१.०७.२०२४ ते ३०.१०.२०२४ या कालावधीतील निविदा अंतर्गत जी कामे प्रस्तावित झाली होती व ती कामे ज्या ठेकेदाराला मिळाली होती, सदरील ठेकेदाराने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Agency Fixing व Agreement साठी जे FDR/ DD सदरील FDR / DD ज्या तारखेस जमा करण्यात आले त्याचा दिनांक, तसेच गुत्तेदारास ज्या तारखेस वापस करण्यात आले त्याचा दिनांक व इतर.. |
| ६६ | ६०५७/२०२५ | २१.०८.२०२५ | पाणी पुरवठात १/२/९ मध्ये Online संचिका क्रमांक २२०८२८९ व २१८४६४१ या दोन्ही संचिकाची प्रस्तावित केले पासून आज पर्यंतची पुर्ण संचीकाची ज्या मध्ये Submission, Estmate, photos, चे तसेच कनिष्ठ अभियंता ते आज पर्यंत ज्यांचे सही झाले आहे त्याची प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, संबंधीत लिपीकाचे ॲक्सीडेंट झाल्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही. तसेच सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली विनंती मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, झोन क्र.१,२ व ९, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।१६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.3014 दिनांक : 2/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६०५८/२०२५**
**बोर्ड क्र.६७**

श्री. शेख हामेद महेमूद, — अपिलार्थी
रा. आर.के. किराणा बाबर कालोनी कटकट गेट, छत्रपती संभाजीनगर, मो. नंबर-९५९५८३९५९१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, झोन क्र.,१,२,व ९, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१०.२०२५ | दि.०१.०७.२०२४ ते ३०.१०.२०२४ या कालावधीतील निविदा अंतर्गत जी कामे प्रस्तावित झाली होती व ती कामे ज्या ठेकेदाराला मिळाली होती. सदरील ठेकेदाराने Agency Fising व Agreement साठी जे FDR/DD सदरहज FDR/DD ज्या तारखेस जमा करण्यात आले त्याचा दिनांक, तसेच गुत्तेदारास ज्या तारखेस वापस करण्यात आले त्याचा दिनांक व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, संबंधित क्लार्कचा ॲक्सीडेंट झाल्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान केलेली विनंती मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, झोन क्र.,१,२,व ९, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3457 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७०९/२०२५**
**बोर्ड क्र.६८**

श्री. लक्ष्मण मोतीराम लोखंडे, — अपिलार्थी
रा. डॉ. आंबेडकर पुतळयाजवळ, किलेअर्क,
छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९५१८५९९११८.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
माहिती व जन संपर्क विभाग,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
माहिती व जन संपर्क विभाग,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे वतीने विधीज्ञ उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०६.२०२५ | सन २०२०-२१ ते २०२४-२५ माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील जाहिरात एजन्सी मार्फत दिल्या जाणाऱ्या जाहिरातीबाबत व इतर १ ते ४ मुद्याबाबत माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, माहिती व जन संपर्क विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. माहिती व जन संपर्क विभाग, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3451 दिनांक :- 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४०१/२०२५**
**बोर्ड क्र.७०**

श्रीमती सिमा बेगम भ्र. सय्यद रफिक्, — अपिलार्थी
रा. नुतन नगर हडको जवळ, ता.जि. परभणी-४३१ ५०१.
मो. नंबर-९४२२०१८५२८.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अतिक्रमण विभाग,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०९.२०२४ | सर्वे क्र२६२ मधील प्लॉट क्र.५९ च्या समोरील बसलेले रोड वरील अतिक्रमण कोणत्या कागदपत्राच्या आधारे आपण त्यांना दिलेली परवानगी किंवा त्या संबंधी कागदपत्र मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही व निकाल दिलेला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण विभाग, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपायुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3450 दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११०६/२०२५**
**बोर्ड क्र.७१**

श्री. शेख खाजा जमील मोहियोद्दीन, — अपिलार्थी
रा. दर्गा रोड, गालीब नगर, ईडन फॅक्शन हॉल जवळ,
परभणी-४३१४०१., मो. नंबर-८४८३८९१०००.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग, परभणी शहर महानगरपालिका, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.११.२०२४ | मौजे परभणी जिंतूर रोड येथील औद्योगिक भूखंड क्र.१ ते २२ मधील भूखंड क्र.१७ कोणाला प्रदान करण्यात आले आहे. त्याबाबत लेखी व कागदोपत्री माहिती प्रमाणित करुन देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपायुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3458 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०८०५/२०२५**
**बोर्ड क्र.७२**

श्री. शेख नसीर शेख मिरा, — अपिलार्थी
रा. सिटी फन्क्शन हॉलच्या मागे, जिंतूर रोड,
परभणी-४३१४०१.
मो. नंबर-९६२३५७९४५९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ अभियंता, परभणी शहर महानगरपालिका, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपअभियंता बांधकाम,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०१.२०२५ | जिंतूर रोड सिटी फक्शन हॉलच्या पाठीमागे आंबेडकर नगर येथील वार्ड नं.१३ घर नं.२८ वर प्रधानमंत्री आवास योजना श्रीमती हलामा बी शेख मिरा यांच्या नावाने मंजूर करण्यात आला त्यासाठी लागणारी कागद पत्रके ची साक्षांकित प्रति देण्यात यावी |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०२.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, सहा. जन माहिती अधिकारी/ कनिष्ठ अभियंता pmay बांधकाम यांनी प्रधानमंत्री योजना संबंधी देय असणारी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १० दिवसात दयावी असा निर्णय पारि

केलेला आहे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी दि:१३.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व्यक्तिगत स्वरुपाची असल्याने देता येत नाही असे कळविण्यात आले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअभियंता बांधकाम, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.श.इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. ३५५७ दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६२२/२०२५**
**बोर्ड क्र.७३**

श्री. इमरान खान नजीर खान, — अपिलार्थी
रा. रामेश्वर प्लॉट, परभणी.
मो. नंबर.९९७०८६१४४२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०३.२०२५ | लक्ष्मणराव बनसोडे सालेहा कौसर हॉस्पीटल, ग्रॅन्ड कॉर्नर, खदान येथे होत असलेल्या नाली बांधकामाचे इस्टीमेंटची प्रत साक्षांकित करुन देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3446 दिनांक : 13/2/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २०९७/२०२५**
**बोर्ड क्र.७४**

श्री. उस्मानखान उमर खान, — अपिलार्थी
रा. गुजरी बाजार, परभणी.
मो. नंबर-९७६६७४४९८६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०१.२०२५ | १. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा (राष्ट्रीय आरोग्य अभियान) मिळालेल्या लाभार्थी यांची यादी.<br>२. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेसाठी नोंद केलेल्या माहिलांची यादी.<br>३. प्रधानमंत्री महात्मा योजनेचा अनुदानाच्या दिलेल्या रक्कम त्याची यादी.<br>४. प्रधानमंत्री योजनेत यांची ऑनलाईन साईट बंद किंवा नाही याची माहिती दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२९.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदरील प्रधानमंत्री मातृ वंदना योजना दि.०१ सप्टेंबर २०२४ रोजी पासून महिला बालविकास विभागाला वर्ग झाली आहे असे कळविण्यात आलले आहेत. तसेच ११.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, सदरील प्रधानमंत्री मातृ वंदना योजना १.० पोर्टल चालू झाल्यास माहिती आपणास उपलबध करुन देण्यात येईल, असा प्रतिसाद दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती महिला बालविकास विभाग या कार्यालयाशी संबंधित असल्याचे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास असा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार सुसंगत हस्तांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन अधिनियमातील कलम ५ (४) नुसार संकलित / एकत्रित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) कळविण्यात यावे.

२. उपायुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3456 दिनांक :-13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६२५/२०२५**
**बोर्ड क्र.८४**

श्री. जिब्रान दानिष, — अपिलार्थी
रा. सुभाष रोड मॉडल इंग्लिशस्कुल जवळ, परभणी,
मो. नंबर-९९६०३५३७७७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शाखा अभियंता बांधकाम,
प्रभाग समिती-अ, परभणी शहर महानगरपालिका परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अभियंता बांधकाम विभाग,
परभणी शहर महानगरपालिका परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०५.२०२५ ऑनलाईन | परभणी सरकारी दवाखान्यासमोरील रस्त्याच्या उजव्या बाजूस (जिंतूर रोडकडे जाताना) फक्त रस्ता Cement Concrete चे काम चालू झाले आहे, पंरतु त्या बाजूस गटार/नालीचे काम का करण्यात आले नाही ? |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता बांधकाम, प्रभाग समिती-अ, परभणी शहर महानगरपालिका परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप अभियंता बांधकाम विभाग, परभणी शहर महानगरपालिका परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3452 दिनांक : 13/3/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५१९७/२०२५**
**बोर्ड क्र.८५**

श्री. उमेश सुरेशराव जाधव देशमुख, — अपिलार्थी
रा. पारदेश्वर मंदिरा जवळ, नांदखेडा रोड, परभणी.
मो. नंबर-९०२१२११६६८.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
विभाग प्रमुख,
आस्थापना विभाग, परभणी शहर महानगरपालिका, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपायुक्त, आस्थापना विभाग, परभणी शहर महानगरपालिका,
परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१३.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०८.२०२५ | डिसेंबर २०२१ ते मार्च २०२५ या कालावधीतील परभणी महानगरपालिका अंतर्गत कार्यरत स्थायी, अनुकंप अस्थायी, रोजंदारी, अभिलेख अतिरिक्त कायम सेवेत असलेल्या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची सेवा ज्येष्ठता यादी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद

केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, आस्थापना विभाग, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपायुक्त, आस्थापना विभाग, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ३५९५ दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७९३/२०२५**
**बोर्ड क्र.८८**

श्रीमती यास्मीन बेगम भ्र. सय्यद इब्राहीम — अपिलार्थी
तर्फे नईमोद्दीन हमीदोद्दीनन सिध्दीकी,
रा. मॉ. मंझील साहेबजान मस्जिद समोर, एकबाल नगर,
परभणी-४३१४०१.मो. नंबर-९४२१८६५३७०.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहाय्यक,
उप अधिक्षक भूमि अभिलेख,
भूमि अभिलेख कार्यालय,
प्रशासकीय ईमारत परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक,
भूमि अभिलेख, प्रशासकीय ईमारत परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.१०.२०२४ ऑनलाईन | १. आपल्या कार्यालयामार्फत परभणी तहसील कार्यालयास दिलेल्या माहितीनुसार मौजे परभणी सर्व्हे नं.१७५ व मौजे नांदखेडा गट क्र.४६ शेत मोजणी झाली असून या दोन्ही शेत मोजणी पंचनाम्याची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत व इतर चार मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे म्हणून माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ असून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तत्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख, भूमि अभिलेख कार्यालय, प्रशासकीय ईमारत परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (सध्यस्थिती), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप अधिक्षक, भूमि अभिलेख, प्रशासकीय ईमारत परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) ५/२/२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 3495 **दिनांक :** 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३७३६/२०२५**
**बोर्ड क्र.८९**

श्री. राघवेंद्र शामराव शिरलेकर, — अपिलार्थी
रा. ७५, रामकृष्णनगर, गणपती मंदिर समोर,
मु. पो. ता.जि. परभणी-४३१४०१.
मो. नंबर-८८०५२४६५८८ / ९५१८९२९२७९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहाय्यक,
उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक भूमि अभिलेख, परभणी

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२५ | सन १९८८ पासून आजपर्यंत प्रत्यक्ष मोजणीबाबत सर्वे क्र.३१२/३१३ ज्यांचे मुळ मालक नरहरराव श्रीनिवास दिवाकरराव हरिहरराव, शाशिकांतराव हरिहर देशपांडे यांनी Ploy विक्रीनंतर व P.R. कार्ड उघडल्यानंतर Link Registry द्वारे मिळकत पत्रिकेचे फेरफारची यादी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०७.०९.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहचदि.०८.०९.२०२५ रोजी दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात यूक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3453 दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०६५५/२०२५**
**बोर्ड क्र.९१**

श्री. सय्यदताजोद्दीन सय्यद युसुफोद्दीन, — अपिलार्थी
रा. सय्यद पान शॉप, गंगाखेड नामा, साखला प्लॉट, परभणी.
मो. नंबर-९५९५९०२७५०.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण उपनिरीक्षक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षण उपसंचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.११.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.१०.२०२४ | दि.०२.०८.१९९६ ते आज तारखे पर्यंत या कालावधीतील परभणी शहर महानगरपालिका शिक्षण विभागातील कार्यरत स.शिक्षिका श्रीमती आलीया फरजाना यांची प्रथम नेमणूक दि.०२.०८.१९९६ रोजी तत्कालीन नगर परिषद, परभणी यांनी अनुकंपा तत्वावर केली होती त्यांची शालार्थ आय.डी.१२DEDAFAF७२०१ असून त्यांच नेमणूक दिनांकापासून OCyobrt २०१६ पर्यंत आपल्या कार्यालयाकडून ८० टक्के व Nov-१६ पासून ५० टक्के वेतन आज तारखेपर्यंत प्रदान करण्यात आले / येत आहे व इतर... |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3454------------------------------------ दिनांक :-18/3/2026-----------------------

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८६८/२०२५**
**बोर्ड क्र.९२**

श्री. मनोहर मारोती दुधमल, — अपिलार्थी
मु. पो. कावलगांव, ता. पुर्णा, जि. परभणी-४३१५११.
मो. नंबर-८८८८१५४११०.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०३.२०२५ | मौजे कालवगांव ता. पुर्णा जि. परभणी येथील जय जवान जय किसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये सन २०१२-१८मध्ये झालेल्या बोगस भरती संदर्भात आपल्या कार्यालयात दि.११.०२.२०२५, दि.०६.०८.२०२४ पोस्टाने पाठवलेले अर्ज दि.२८.०८.२१, दि०१.११.२०२२ या अर्जावर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्यप्रत मध्ये मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२८.०४.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०४.२०२५रोजी माहिती दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3496 दिनांक : 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९१८/२०२५**
**बोर्ड क्र.९३**

श्री. हेमंत गांजरे, — अपिलार्थी
रा. ८७, विठ्ठलनगर-१, नागपूर-४४००३४.
मो. नंबर-९८२२७२६२३९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण उपनिरीक्षक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
शिक्षण उपनिरीक्षक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी)**
**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०४.२०२५ | वर्षे २०१२ ते वर्षे २०२५ या कालावधीतील शिक्षण उपसंचालक संभाजीनगर या कार्यालयात माध्यमिक शिक्षणाधिकारी तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयातून शालार्थ क्रमांक मिळण्यासाठीची यादीची साक्षांकित माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना व्यक्तीश: सुनावणीसाठी येणे शक्य नसल्यामुळे ऑनलाईन प्रथम अपिलाची सुनावणी सुनावणी घेण्याची विनंती केली होती. तथापि त्यांनी ऑनलाईन सुनावणीची नोटीस प्राप्त झालेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, विस्तृत स्वरुपाची असून दैनंदिन कामकाजावर परिणाम करणारी आहे. तसेच सदरील माहिती मध्ये कर्मचारी यांची वैयक्तीक स्वरुपाच्या माहितीचा देखील समावेश आहे. जसे की, कर्मचारी यांचे नांव, त्यांचा पहिले वेतन, पहिले वेतन मिळाल्याचा दिनांक इ. यासारखी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नसल्याचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाचे स्पेशल पिटीशन क्र.२७७३७/२०१२ मधील निर्णयपत्राच्या परिच्छेद १३ मध्ये कले आहे. त्यानुसार माहिती देता येणार नाही, असे कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी पाठविलेले पत्र न स्वीकारल्यामुळे सदर पत्र कार्यालयास परत आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यामध्ये तफावत दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3464 दिनांक :- 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५४२/२०२५**
**बोर्ड क्र.९४**

श्री. ब्रिजमोहन धिरजप्रसाद मिश्रा, — अपिलार्थी
रा. पेठ गल्ली परळी, ता. परळी वै.जि. बीड-४३१५१५.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, भलकल गेट, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०६.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, क.लि. उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०६.२०२५ | १९९० ते १९९६ या कालावधीत बीड जिल्हयातील वरीष्ठ लेखा परीक्षक, जि. प. बीड, श्री. बी. ए. शिंदे यांचेमार्फत १३२ शाळेची विशेष लेखापरीक्षण पुर्ण करण्यात आले होते. व त्या सर्व लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती फक्त आपल्याच कार्यालयात दाखल केलेल्या आहेत. त्यांच्या प्रती इतर कोणत्याही कार्यालयात नाहीत तरी त्या विशेष लेखापरीक्षण झालेल्या १३२ शाळेची यादी देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती लेखाधिकारी (शिक्षण) बीड या विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या कार्यालयास

दि.२४.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये वर्ग करुन तसे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि..२१.०६.२०२५ रोजीच्या अर्जानुसार कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, भलकल गेट, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षण उपसंचालक कार्यालय, भलकल गेट, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3465 दिनांक : 13/3/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०७६/२०२५**
**बोर्ड क्र.९५**

श्री. राहुल चंद्रकांत भारती,
रा. रिमझिम, मयुर शाळेजवळ, देवपूर, जि. धुळे. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१०.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०७.२०२५ | सोबत जोडलेल्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही/ कारवाईची माहिती त्यांच्या सत्यप्रती मिळाव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा अधिकार अर्जामध्ये डॉ. वंदना वाहुळ, शिक्षण उपसंचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुर्ण यांनी दिलेल्या पत्राचा संदर्भाचा बोध होत नाही, तुर्त आपला दि.१०.०७.२०२५ रोजीचा माहिती अर्ज या कार्यालयाच्या स्तरावरुन निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थी यांना दि.०५.०८.२०२५ रोजी कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप अप्राप्त आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती/माहितीची वस्तुस्थिती अवगत केलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 3445 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०३३६/२०२५**
**बोर्ड क्र.९६**

श्री. इकबाल शेख गणी पटेल,
रा. राजीव गांधी नगर, पटेल मंडळी खुलताबाद,
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद).
मो. नंबर-९७६३०८८१२३.

अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, अधिक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०८.२०२४ | कैलास ट्रस्ट नोंदणी झाल्यापासून ते आजपर्यंत या कालावधीतील १. कैलास ट्रस्ट वेरुळ नोंदणी क्र.E-०६ चे प्रमाणपत्र, ट्रस्ट घटना, विश्वस्ताचे मृत्यू झालेल्याचे मृत्यू प्रमाणपत्रे नवीन विश्वस्त सदस्य समाविष्ट करण्यासाठी घेण्यात आले त्या संपूर्ण प्रोसिडिंग, ठरावाच्या प्रती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, म.सा.वि.व्य.अधिनीयम १९५१ चे नियम २३ प्रमाणे व मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक ५९८ नुसार नोंदणीकृत न्यासाचे कागदपत्रांची प्रमाणीत नक्कल मिळणेचे करीता सशुल्क तरतुद उपलब्ध असून त्याकरिता, आपण आवश्यक ती माहिती प्रमाणीत प्रत मिळविणेकरीता स्वतंत्र अर्ज देवून विहीत प्रक्रीयेचा अवलंब करुन अभिलेखाचे नक्कल प्राप्त करावी असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागितलेली माहिती नाकारली नसून त्याची प्रमाणित प्रत प्राप्त करुन घेण्याचे कळविले आहे. असा निष्कर्ष काढून अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका याचा सारासार विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१२.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ३५९७ दिनांक 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०५६६/२०२५**
**बोर्ड क्र.९७**

श्री. अबरार शब्बीर शेख, — अपिलार्थी
रा. सोनखेडा, ता. खुलताबाद, ता.जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९७३००४०४१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अधिक्षक धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०८.२०२४ | सन २००७ ते २०१२ ते आजपर्यंत या कालावधीतील विश्कर्मा धर्मक्षेत्र चॅरीटेबल व विश्वकर्मा तीर्थक्षेत्र तिर्थधाम चेरीटेबल ट्रस्ट मौजे वेरुळ ते खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर १. स्थापना वर्षे, २ व्हीजन, ३. ट्रस्टी नाव, ४. लोकवर्गणी व इतर... |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२३.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, आपण विश्वकर्मा धर्मक्षेत्र ट्रस्ट व विश्वकर्मा तिर्थक्षेत्र तिर्थधाम चॅरीटेबल ट्रस्ट या न्यासाच्या बाबत ०१ ते ०४ मुद्यात माहिती मिळणेची विनंती

केली आहे. त्यानुसार मुद्दा क्र०१ व ०३ बाबत आपले अर्जात नमूद नावावरुन नोंदणीकृत न्यासाची यादी तपाली असता श्री विश्वर्मा तिर्थधाम चॅरीटेबल ट्रस्ट या नावो, नो.क्र.ई-१००३ (स्थापना वर्षे-२००४) या क्रमांकाने व श्री विश्वर्मा धर्मसेन चॅरीटेबल ट्रस्ट या नावाने नों.क्र.ई-५५९ (स्थापना वर्षे:- १९९६) या क्रमांकाने न्यास नोंदणी असल्याचे दिसून येते. संदर्भीय अर्जात नमूद मुद्दा क्र.०२ व ०४ मध्ये मागणी करण्यात आलेली माहिती या कार्यालयातील अभिलेखा शाखेच्या अभिलेख्याचा भाग नाही/ कार्यालयाशी संबंधीत नाही. करीता मुद्दा क्रमांक १,३ बाबत कळविण्यात येते की, म.सा.वि.व्य.अधिनीयम १९५१ चे नियम २३ प्रमाणे व मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक ५९८ नुसार नोंदणीकृत न्यासाचे कागदपत्रांची प्रमाणीत नक्कल मिळणेचे करीता सशुल्क तरतुद उपलब्ध असून त्याकरिता, आपण आवश्यक ती माहिती प्रमाणीत प्रत मिळविणेकरीता स्वतंत्र अर्ज देवून विहीत प्रक्रीयेचा अवलंब करुन अभिलेखाचे नक्कल प्राप्त करावी असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागितलेली माहिती नाकारली नसून त्याची प्रमाणित प्रत प्राप्त करुन घेण्याचे कळविले आहे. असा निष्कर्ष काढून अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका याचा सारासार विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१२.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3498 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०१५८/२०२५**
**बोर्ड क्र.९८**

श्री. खरे समाजसेवक, — अपिलार्थी
रा. मनाली अपार्टमेंट, मु. पो. इंदिरानगर, ता.जि. नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी उपविभाग, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, प्लॉट क्र.जे.१३, एम.आय.डी.सी. गरवारे स्टेडीयम समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०८.२०२४ | १. सुखदेव ना. लगड+३ जण व २. मोहन जगन्नाथ लगड रा. स.नं.२०५/४ लगड वस्ती मध्ये सुखदेव+३ जण बेकायदा पत्राघर उभारुन अवैध मार्ग विज मीटर व स.नं.२०७/६ मधील विहिरीवर ५ एच.पी ची मोटर बेकायदा बसवून यास काळया रंगाचा पाईप जोडला असून या दोन्हीची वीज खंडीत करुन हे साहित्य आपले कार्यालयात जमा करावे आणि या पत्रातील एकूण १२ मुद्देचे सर्व दस्त द्यावे व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेला अर्ज आपली नोटीस प्राप्त झाल्यावर समजले आहे. मा. आयोगाने काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी उपविभाग, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, प्लॉट क्र.जे.१३, एम.आय.डी.सी. गरवारे स्टेडीयम समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3466 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४९२/२०२५**
**बोर्ड क्र.१००**

श्री. बालाजी अण्णासाहेब गित्ते, — अपिलार्थी
रा. स्नेह नगर, परळी वै. जि. बीड.
मो. नंबर-८९९९६६१३१३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अति.कार्यकारी अभियंता,
प्रादेशिक कार्यालय,
जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अधिक्षक अभियंता (सं), महावितरण प्रादेशिक कार्यालय,
जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२५ | १६ सप्टेंबर २०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील उपविभाग कार्यालय, परळी वैजनाथ येथील विज-बील घोटाळ प्रकरणाची फेर नव्याने चौकशी करण्यासाठी प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत पत्र क्र.१३७० दि.१६.०९.२०२२ हे पत्र काढून चार सदस्य कमिटी गठीत केली. त्या कमिटीने सदरील परळी वै. वीज बील घोटाळा प्रकरणाचे नव्याने फेर चौकशी पुर्ण करुन त्याचा अहवाल मुख्य अभियंता लातूर यांचे गोपनीय पत्र क्र.५८ दि.७.६.२०२३ नुसार प्रादेशिक कार्यालय |

| | |
|---|---|
| | छत्रपती संभाजीनगर येथे चौकशी अहवाल सादर केला त्या अहवालानुसार जवळ-जवळ १७ दोषी अधिकारी व कर्मचारी दाखवले आहेत तरी त्या दोषीवर मा. सहव्यवस्थापकीय संचालक साहेब यांनी केलेल्या कारवाईच्या पत्राच्या अहवालाची सत्यप्रत मला प्रामाणित करुन देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागितलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीबद्दल असल्यामुळे माहिती अधिकार कलम ८(त्र) नुसार तसेच शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा मंत्रालय मुंबई दि.१७.१०.२०१४ प्रमाणे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. तसेच अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अति. कार्यकारी अभियंता, प्रादेशिक कार्यालय, जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अधिक्षक अभियंता (सं), महावितरण प्रादेशिक कार्यालय,जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3467 दिनांक : 13/3/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६४४/२०२५**
**बोर्ड क्र.१०१**

सौ. पायल जगदीश बुलबुले, — अपिलार्थी
रा. रुक्मिणी निवास साईनगर जोगेश्वरी, ता. गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९१७५३९४५०४१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग कार्यालय,
वाळूज ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप कार्यकाकरी अभियंता,
महावितरण उपविभाग कार्यालय, वाळुज, ता. गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झालेले आहे. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 3468 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २०३४/२०२५**
**बोर्ड क्र.१०४**

श्री. राजकुमार काशीनाथ ताकवाले,
रा. लक्ष्मीनगर नारळारोड पैठण,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९७६३२२२०८७. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महावितरण कार्यालय, उपल विभाग, पैठण,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महावितरण ग्रामीण विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०५.२०२१ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०२.२०२५ | दि.१२.०६.२०२४ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील अर्जावर केलेल्या कारवाईचा व चौकशीचा अहवाल तसेच विज पुरवठा केलेल्या ग्राहकांचे नाव व ग्राहक क्रमांक यांची माहिती देण्यात यावी व इतर दोन मुद्याबाबत.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-३४९९ दिनांक :- ~~13/3~~ 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२२२/२०२५**
**बोर्ड क्र.१०५**

श्री. भालेराव विजय गोविंदराव — अपिलार्थी
रा. २००. करुणा सदन नंदनवन कॉलनी, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९४०४२७६४४७.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यकारी अभियंता,
अउदा प्रकल्प नि.संवसु परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्य अभियंता,
अउदा प्रकल्प नि, संवसु परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०८.२०२४ | निवृत्त मुख्य अभियंता, छत्रपती संभाजीनगर श्री भोपळे साहेब यांनी नियमबाहय पध्दतीने केलेल्या प्रतिनियुक्ती व बदलीबाबत (मार्च २०२४). |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती चुकीची प्राप्त झालेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, माहिती देण्याचे आदेशीत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.०८.०३.२०२५ रोजी ७४ पृष्ठांची माहिती देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अर्जातील मागणीच्या विसंगत माहिती देऊन फसवणूक करणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी चुकीची माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-3500 दिनांक :- 13/3/2026

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९९७/२०२५**
**बोर्ड क्र.१०६**

श्री. मुसा हसन शेख, — अपिलार्थी
रा. धाडस सामाजिक संघटना संपर्क कार्यालय,
गंगापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-७८७५७६४१०५.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
महावितरण उप विभाग,
गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
महावितरण ग्रामीण विभाग-II, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०५.२०२५ | एप्रिल २०२२ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील आपल्या कार्यक्षेत्रात नागार्जून कॅट्रक्शन कंपनीने केलेल्या कामाबाबतीत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकलीत करुन आज रोजी अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3501 दिनांक : 13/3/2026

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९४८/२०२५ व ४९४९/२०२५**
**बोर्ड क्र.१०७ व १०८**

श्री. ज्ञानेश्वर अशोक शिंदे, अपिलार्थी
रा. सुरेगांव, ता. नेवासा, ह.मु. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर-८६६९१७८०१०.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महावितरण, उपविभाग शहागंज, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
शहर विभाग क्र.०१, महावितरण, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| १०७ | ४९४८/२०२५ | १९.०६.२०२५ | सन २०१७ ते आजपावेतो या कालावधीतील हर्सूल सर्व्हे नंबर २५/१ मधील खाजगी जागेवरुन ते आजपावेतो दरम्यान आपले विभागाने विनापरवानगी, अनधिकृतपणे, सामाईक बांधाने विदयुत HT लाईन न नेता त्रास देण्यासाठी चुकीचे पध्दतीने HT लाईन नेलेसंबंधाने तातडीने माहिती मिळावी व इतर.. |
| १०८ | ४९४९/२०२५ | १९.०६.२०२५ | सन २०१७ ते आजपावेतो या कालावधीतील १.खाजगी जागेतून विदयुत HT लाईन, विदयुत LT लाईन नेण्याबाबत व हटविण्याबाबत आपले विभागाची, शासनाने निर्देश दिलेली SOP / मानक कार्यप्रणालीची माहिती मिळावी २. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | खाजगी जागेवरील विदयुत HT,LT पोल/ तारों हटविणेबाबत नागरीकांनी कशी विनंती करावी व याबाबत महावितरणची विदयमान कार्यपध्दतीचीबाबत लेखी माहिती मिळावी. ३. प्रशासनाचे शहर विद्रुपीकरण थांबवून, शहरी भागात भूमीगत विजलाईन, वाहीनी नेण्यासंबंधी दिलेले निर्देश, आदेशाची प्रत मिळावी, ४. हर्सूल सर्व्हे नंबर २५/१ मधील दक्षीण-उत्तर दिशेने नेलेली विदयुत HT लाईन तक्रारीनंतर काही ठिकाणी भूमीगत करण्यात आली असून, आम्ही रीतसर विनंती करुनही, उर्वरीत HT लाईन भुमीगत केली नाही, याबाबत त्वरीत माहिती मिळावी. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही व त्यांनी पुढील तारीख देण्याची विनंती केलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा अति कार्यकारी अभियंता शहर विभाग क्र.१ छत्रपवती संभाजीनगर यांनी दि.२५.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत जन माहिती अधिकारी तथा अति. कार्यकारी अभियंता, शहागंज उपविभाग, मराविविकंम, छत्रपती संभाजीनगर यांना कलम ६(३) नुसार वर्ग केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अर्जदारास १५ कार्यालयीन दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश पारित केला आहे. तथापि संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचे लेखी निवेदनात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, उपविभाग शहागंज, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली (सन २०२३-२०२४ एक वर्षे कालावधीची) माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, शहर विभाग क्र.०१, महावितरण, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3469 दिनांक : 13/3/2026

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५७१३/२०२५ ते ५७१५/२०२५**
**बोर्ड क्र.१०९ ते १११ एकूण प्रकरणे०३**

श्री. भालेराव विजय गोविंदराव, — अपिलार्थी
रा. २००, करुण सदन, नंदनवन कॉलनी,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१. मो. नंबर-७७३८३९११२०.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अतिरिक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कं.मर्या., सहव्यवस्थापकीय संचालक, महावितरण्या प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अधिक्षक अभियंता,
म.रा.वि.वि. कं.मर्या., सहव्यवस्थापकीय संचालक, महावितरण प्रादेशिक विभाग,छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| १०९ | ५७१३/२०२५ | २५.०७.२०२५ | दि.०१ जून २०२३ ते आजपर्यंत या कालावधीतील उपविभाग आणि पथक प्रमुख अभियंत्याचे मुख्यालय आणि ते रहात असलेल्या निवासाचा पुर्ण पत्ता व इतर.. |
| ११० | ५७१४/२०२५ | २२.०७.२०२५ | दि.०१ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कालावधीतील प्राणांतिक विद्युत अपघाताच्या चौकशी नमुना-अ अर्ज |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आणि त्यांच्या अवलंबितास पुरावा अदा केलेल्या नुकसान भरपाईची साक्षांकित प्रत देण्यात यावी व इतर.. |
| १११ | ५७१५/२०२५ | २५.०७.२०२५ | दि.०१ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कालावधीतील परिमंडळ, मंडळ, विभाग, उपविभाग आणि पथक प्रमुख अभियंता त्यांनी वीज चोरीवर केलेल्या कार्यवाहीची पुरावा साक्षांकित प्रत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर/ लातूर व नांदेड परिमंडळ कार्यालयाला कलम ६(३) नुसार वर्ग करुन त्याची प्रत अपिलार्थी यांना पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, अपिल निर्णय प्रलंबित आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3470 दिनांक : 13/3/2026